# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी यांनी घेतला फुटाळा प्रकल्पाच्या कामाचा आढावा



नागपूर,०१ जानेवारी: केंद्रीय रस्ते निधी (सेन्ट्रल रोड फंड - सीआरएफ) अंतर्गत होऊ घातलेल्या फुटाळा प्रकल्पाचे केंद्रीय मंत्री माननीय श्री नितीन गडकरी यांनी आज फुटाळा प्रकल्पाला भेट देऊन तेथे सुरू असलेल्या प्रकल्पाच्या कामाचा आढावा घेतला. सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत महा मेट्रो सदर कार्यपूर्ण करीत आहे. केंद्रीय मंत्री श्री. नितिन गडकरी यांनी महा मेट्रो द्वारे करण्यात आलेल्या कार्याप्रती समाधान व्यवक्त करत फुटाळा तलावा मध्ये फ्लोटिंग रेस्टोरेंटचे संकल्पना कशी अमलात आणता येईल या संबंधी तपासणी करण्याची सूचना त्यांनी केली.

महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालकी डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी श्री. गडकरी यांनी या संपूर्ण प्रकल्पाची विस्तुत माहिती देत आता पर्यंत झालेल्या कार्याचे सादरीकरण केले. या वेळी नासुप्रचे सभापती श्री. मनोज कुमार सूर्यवंशी, महा मेट्रोचे संचालक (प्रकल्प) श्री. महेश कुमार तसेच इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



या प्रकल्पाचे काम महा मेट्रो नागपूर करीत आहे आणि त्यात व्ह्यूअर्स गॅलरी, रस्त्याच्या कडेला दुकाने आणि पार्किंग प्लाझाचे बांधकाम समाविष्ट आहे. परिघातील रस्त्यांच्या कॉँक्रिटीकरणाचाही या कामात समावेश आहे. प्रकल्पाच्या कामाची एकूण किंमत ₹ 112.89 कोटी आहे. व्ह्यूअर्स गॅलरीची लांबी 350 मीटर आहे आणि तिची क्षमता 4,000 व्यक्ती (बसणे) आणि 1,500 व्यक्ती (उभे) इतकी आहे. VIP कार पार्किंग (08) आणि दुचाकी आणि सायकल पार्किंगसाठी (प्रत्येकी 24) तरतूदही करण्यात आली आहे. याशिवाय पार्किंग प्लाझा 6,000 चौरस मीटर भूखंडावर बांधण्यात आला आहे, जे पूर्ण झाल्यावर चार चाकी 969 आणि दुचाकी 770 एवढी बहु-स्तरीय पार्किंग क्षमता येथे असेल.



या प्रकल्पाचे एकूण चार भाग असून ते खालील प्रमाणे आहे:

१. दर्शक दिर्घेसह प्रोजेक्टर कक्ष

२. बहुमजली वाहन तळ

३. सिमेंट काँक्रीट रस्ता

· **दर्शक दिर्घेसह प्रोजेक्टर कक्ष** : व्ह्यूइंग गॅलरीचे काम जानेवारी 2020 मध्ये सुरू झाले. दर्शक दिर्घेची एकूण लांबी ३५० मीटर असून आसन क्षमता ४,००० आहे. या प्रकल्पाच्या अंतर्गत नागपूर सुधार प्रन्यास (नासुप्र) फुटाळा तलावात मल्टी मीडियालेझर शो देखील तयार करते आहे. दर्शक दिर्घेत बसून हा लेझर शो बघता येईल. दर्शक दिर्घेच्या बाजूला प्रोजेक्टर कक्ष बांधण्याचे काम देखील सुरु आहे. एकूण ३५० मीटर लांब असलेल्या दीर्घा टेंसाईल रूफ टॉपच्या माध्यमाने झाकलेली असेल. दर्शक दिर्घे जवळ वाहन ठेवण्याची सोय असेल ज्यात १३ कार, २४ दुचाकी आणि २४ सायकल पार्किंगची सोय असेल.

· **बहुमजली वाहन तळ** : एप्रिल २०२१ मध्ये काम सुरू झाले.या प्रकल्पाअंतर्गत बहूमजली वाहन तळ देखील प्रस्तावित असून लेझर शो बघण्य करता आलेले दर्शक आपली वाहने इथे ठेऊ शकतात. येथील पार्किंग

व्यवस्थेचे स्वयंचलीत असेल. येथे १,००० कार तसेच ३०५ दुचाकी वाहनांकरता पार्किंगची सोय असेल.पार्किंग प्लाझाच्या वर 334.83 चौरस मीटर क्षेत्रफळावर 'ओपन टू स्काय' रेस्टॉरंट बांधण्याचेही प्रस्तावित आहे.

· **सिमेंट काँक्रीट रोड** : फुटाळा लगत असलेल्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटचे काम पूर्णत्वास आले असून या रस्त्याची लांबी एकूण २.८६ किलोमीटर तर रुंदी १८ मीटर आहे. दर्शक दिर्घेच्या मागे हा रस्ता आहे.प्रकल्पाच्या कामादरम्यान एकूण 44 विद्युत खांब, 20 क्रॉसिंग आणि 2 ट्रान्सफॉर्मर स्थलांतरित करण्यात आले आहेत.

फुटाळा हे शहरातील सर्वात गजबजलेले आणि उत्सवी ठिकाण आहे आणि दररोज शेकडो नागरिक - विशेषतः तरुण पिढी या ठिकाणी गर्दी करतात. सुट्टीच्या दिवशी आणि नवीन वर्षाच्या दिवसासारख्या विशेष प्रसंगी हे स्थान अत्यंत गजबजलेले असते. एकदा लोकांसाठी खुले झाल्यावर, हा प्रकल्प शहरातील सर्वात मोठे आकर्षण ठरेल.

· **म्युझिकल फाऊंटनची विशेषता**:

फ्रान्सच्या क्रिस्टल कंपनीतर्फे ९४ म्युझिकल फाऊंटन लागणार असून हे फवारे आकर्षणाचे केंद्र ठरतील. लाईट, साऊंड आणि मल्टीमीडिया शो लागणार असून हे स्थळ नागपूरचे महत्त्वपूर्ण पर्यटन स्थळ म्हणून उदयास येईल. म्युझिकल फाऊंटनची विशेषता म्हणजे ऑस्कर पुरस्कार विजेता संगीतकार पद्मश्री ए.आर. रेहमान यांचे संगीत आणि गीतकार पद्मश्री गुलजार यांचा आवाज. फाऊंटनच्या साऊंड डिझाईनची जबाबदारी ऑस्कर विजेता पद्मश्री रसेल पुकुट्टी यांना सोपविण्यात आली आहे. थिया (टीएचआयए) पुरस्कार विजेता गुईलोम डफलट यांना फाऊंटन डिझाईनची जबाबदारी देण्यात आली आहे. तांत्रिक संचालक म्हणजे एमी पुरस्कार विजेता वाय. अल्फोन्स रॉय आणि सहा वेळा राष्ट्रीय पुरस्कार विजेता राहिलेल्या आशा केलूनी या निर्मितीच्या क्रिएटीव्ह डायरेक्टर म्हणून कार्य सांभाळणार आहेत. क्रिस्टल ग्रुपचे सीईओ मायकल अमान हे फाऊंटन प्रोडक्शन आणि इन्स्टॉलेशन करतील. यानुसार फुटाळा येथील वर्ल्ड क्लास म्युझिकल फाऊंटनच्या निर्मितीत विविध क्षेत्रातील दिग्गजांचा सहभाग राहणार आहे.सध्या या प्रकल्पाच्या डिझायनिंग व तांत्रिक बाबींवर कार्य सुरू आहे.